सकाळ

# आशियातील सर्वाधिक लांब मेट्रो डबल डेकरचे मोदींच्या हस्ते उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ९ : आशियातील सर्वाधिक लांब डबल डेकर मेट्रो मार्ग, तसेच चार स्तरीय वाहतूक कॉरिडोरचे उद्घाटन रविवारी (ता. ११) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केले जाणार आहे. हा द्विस्तरीय वाहतुकीचा सर्वात मोठा डबल डेकर मार्ग आहे.



नागपूर शहरामधील द्विस्तरीय वाहतुकीचा सर्वात मोठा डबल डेकर मार्ग.

नागपूर शहरातील या डबल डेकर मार्गाचे प्रमुख आकर्षण आहे, चारस्तरीय वाहतूक कॉरिडॉर. जमिनीपासून २८ मीटर उंचीवर थेट रेल्वे ट्रॅक ओलांडून हा चारस्तरीय मार्ग तयार करण्यात आला आहे. यामध्ये सर्वात खाली पादचारी आणि वाहतुकीसाठीचा भुयारी मार्ग आहे. त्यावर रेल्वे ट्रॅक आहे. रेल्वे ट्रॅकवर राष्ट्रीय महामार्ग आणि त्यावर मेट्रो ट्रॅक अशी या कॉरिडोरची रचना आहे. या मार्गाची एकूण लांबी ५.३ किलोमीटर आहे.

गड्डीगोदाम रेल्वे क्रॉसिंगवर याची उभारणी करण्यात आली असून या रस्त्यासाठी १,६५० मेट्रिक टन वजन आणि ८० मेट्रिक टन स्टिलचे स्ट्रक्चर उभारण्यात आलेले आहे. या रेल्वे क्रॉसिंगवर दररोज १५० हून अधिक रेल्वे आणि एक लाखांहून अधिक वाहने ये-जा करतात. त्यावर स्टिलचे सुपरस्ट्रक्चर ठेवण्यात आले आहे. १८.९ एम रुंद गर्डरचे लाँचिंग ही भारतीय रेल्वेतील बहुधा पहिलीच घटना आहे. हे काम अत्यंत आव्हानात्मक आणि गुंतागुंतीचे होते. देशात अशा प्रकारच्या उभारणीचा प्रयत्न यापूर्वी कधीही झाला नसल्याचे प्रकल्प व्यवस्थापक अरुण कुमार यांनी सांगितले आहे.